बीड वर्ष १ अंक २२३ | गुरुवार, दिनांक ८ ऑक्टोबर २०२६ | Reg.No. MHMAR/25/A4846 | dailysatyawadi@gmail.com | पाने-४ | किंमत ५ रूपये

दैनिक आपल्या लोकांचा
# सत्यवादी
संपादक : शेख रेहान | www.esatyawadi.com | मो. 9822728340

**सत्य वचन**

विरोधकांनी गरीब नगरसेवकाच्या टपरीची टीप देवून त्याच्या पोटावरच वार केला!




# केंद्राचे पथक आजपासून जिल्ह्यात दुष्काळ पाहणी करणार!

# दाहकता समजण्यासाठी पथकाने अलिशान हॉटेलमध्ये न थांबता गावातच मुक्काम करावा!

## ११ सदस्य, ३ पथके आणि ८ जिल्ह्यांचा घेणार आढावा; ११ तारखेपर्यंत पथक तळ ठोकून राहणार

**बीड | सत्यवादी**

खरीप हंगाम २०२६ मध्ये राज्यातील विविध भागांत निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करण्यासाठी केंद्र सरकारचे ११ सदस्यीय आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथक आज गुरुवारी (दि. ८) महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहे. हे पथक दि. ८ ते ११ ऑक्टोबर या कालावधीत राज्यातील दुष्काळग्रस्त आणि टंचाईग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. केंद्राच्या कृषी

(पान २ वर...)

### राज्य सरकार आधी मदत देणार!

"केंद्राचा निधी येण्यास प्रशासकीय प्रक्रियेमुळे वेळ लागतो. मात्र, २००१ नंतर प्रथमच राज्य सरकारने सर्व जुने निकष बाजूला ठेवून नोव्हेंबर-डिसेंबरऐवजी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यातच दुष्काळ जाहीर केला आहे. २३ हजार गावांमधील पंचनामे पूर्ण झाले असून, उर्वरित काम संपवून राज्य शासन स्वतःच्या तिजोरीतून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात थेट आर्थिक मदत पोहोचवेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगीतले.





क्रिती सेनॉनने नुकतीच करीना कपूरच्या व्हॉट वुमन वॉन्टच्या सहाव्या सीझनमध्ये हजेरी लावली होती. यावेळी करीनाशी बोलताना ती म्हणाली, "माझा ब्लाऊज प्राइम-टाइम न्यूजमधल्या सहा जणांच्या पॅनेलच्या चर्चेचा विषय झाला, यावर मला विश्वासच बसत नव्हता." क्रितीचे बोलणे ऐकून करीना होकार देत म्हणाली, "मला माहीत आहे." जेव्हा क्रितीला कपड्यांवरून ट्रोल केले होते, त्यावेळी तिने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत उत्तर दिले होते. महिलांना आजही कपड्यांवरून का जज केलं जातं, असा प्रश्न तिने विचारला होता.

## बीड शहरातील पाणी टंचाईसह नागरी समस्यांवर भाजप आक्रमक

### डॉ.योगेश क्षीरसागरांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**बीड | सत्यवादी**

शासनाने बीड तालुक्यात दुष्काळ जाहीर केल्यानंतर शहरातील पाणीटंचाईसह विविध नागरी समस्या गंभीर बनल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याच्या मागणीसाठी भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मंगळवारी (दि. ६) बीड नगरपरिषद प्रशासनाची भेट घेऊन निवेदन दिले. समस्यांवर कालमर्यादेत ठोस निर्णय घेऊन उपाययोजना न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा भाजपच्या वतीने

(पान २ वर...)



## स्लॅब भरण्याच्या कामासाठी घरातून गेलेला इसम बेपत्ता

**बीड | सत्यवादी**

स्लॅब भरण्याच्या मशीनवर काम करण्यासाठी घरातून गेलेला ४२ वर्षीय इसम बेपत्ता झाल्याची घटना बीड शहरात समोर आली आहे. याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, बेपत्ता व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख जाफर शेख

(पान २ वर...)

## सरकार लोकांना तोंड दाबून बुक्क्या मारु लागले!

### ऐन दुष्काळात कर्जाचा हप्ता वाढवला

**मुंबई | सत्यवादी**

महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मोठा निर्णय घेत रेपो दरात ०.२५ टक्क्यांची वाढ केली आहे. त्यामुळे रेपो दर ५.२५ टक्क्यांवरून ५.५० टक्क्यांवर पोहोचला असून, त्याचा थेट परिणाम गृहकर्ज, वाहनकर्ज तसेच अन्य कर्जांच्या व्याजदरांवर होण्याची शक्यता आहे. जवळपास चार वर्षांनंतर, म्हणजे फेब्रुवारी २०२३ नंतर प्रथमच आरबीआयने

(पान २ वर...)

## दुनियादारी

### राहुल-प्रियंकांचे ज्ञानेश कुमारांविरोधात सलग दुसऱ्या दिवशी आंदोलन

**नवी दिल्ली...**

ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत राहुल आणि प्रियंका गांधी यांनी बुधवारी सलग दुसऱ्या दिवशी आंदोलन केले. यावेळी, हे दोघे जंतरमंतरपासून सुमारे २०० मीटर आधीच रस्त्यावर बसले. सुरक्षा दलांनी त्यांना पुढे जाण्यापासून रोखले असता, प्रियंका संविधानाची प्रत हातात घेऊन रस्त्यावरच आडव्या झोपल्या. दरम्यान, काँग्रेस कार्यकर्ते आणि सुरक्षा कर्मचारी यांच्यात झटापट झाली. तत्पूर्वी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आयोजित केलेल्या दुपारच्या जेवणासाठी विरोधी पक्षांच्या खासदारांसोबत सागर रत्ना रेस्टॉरंटमध्ये उपस्थित राहिल्यानंतर राहुल आणि प्रियंका जंतरमंतरच्या दिशेने निघाले होते.

### आंदोलन करा, पण पुणेकरांचे जनजीवन ठप्प होऊ देऊ नका

**पुणे...**

पुण्यात सुरू असलेल्या एमपीएससी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. शांततापूर्ण आणि कायदेशीर पद्धतीने आंदोलन करण्याचा अधिकार आंदोलकांना असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. मात्र, आंदोलनामुळे पुणेकरांच्या दैनंदिन जनजीवनावर परिणाम होता कामा नये, अशी स्पष्ट भूमिका उच्च न्यायालयाने मांडली आहे. पुणे शहरातील रस्ते, पूल आणि अन्य सार्वजनिक ठिकाणी अडथळे निर्माण होऊन वाहतुकीवर परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. आंदोलनाच्या नावाखाली शहरातील जनजीवन ठप्प होईल किंवा सामान्य नागरिकांना प्रवास करताना अडचणींचा सामना करावा लागेल, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, असेही न्यायालयाने अधोरेखित केले.

### मिथुन चक्रवतीला कॅबिनेट दर्जा!

**कोलकाता...**

पश्चिम बंगालमध्ये मागील काही दिवसांपासून मोठ्या घडामोडी पाहायला मिळत आहेत. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या सरकारमध्ये ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांच्यावर एक मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पश्चिम बंगाल सरकारमध्ये मिथुन चक्रवर्ती यांची माहिती व सांस्कृतिक व्यवहार विभागाचे मुख्य सल्लागार म्हणून अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. आता या नव्या पदासह मिथुन चक्रवर्ती यांना थेट कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा मिळणार आहे.

## महिन्यातून फक्त तीन दिवस पाणी!



### परळीकरांच्या पाणी हक्कावर गदा येणार!

**परळी | सत्यवादी**

परळी शहरातील पाणीप्रश्नाने आता गंभीर वळण घेतले असून, नव्या पाणीपुरवठा वेळापत्रकामुळे नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. शहरात महिन्यात केवळ तीन दिवस पाणीपुरवठा केला जाणार असून, प्रत्येक वेळी अवघे ४५ मिनिटे पाणी मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्यात नागरिकांना केवळ १३५ मिनिटे म्हणजेच सव्वा दोन तासांपेक्षाही कमी वेळ नळाद्वारे पाणी मिळणार आहे.

शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी १० टक्के पाणीकपातीचा निर्णय घेतला असताना, परळीत त्याची अंमलबजावणी करताना महिन्यात केवळ तीन दिवस पाणीपुरवठा करण्याचा निर्णय नेमका कोणत्या निकषावर घेण्यात आला, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. महिन्यात ३० दिवस आणि त्यापैकी केवळ तीन दिवस पाणीपुरवठा होणार असल्याने उर्वरित दिवस नागरिकांनी पाण्याची व्यवस्था कशी करायची, हा प्रश्न निर्माण झाला आहे. पिण्याचे पाणी, स्वयंपाक, आंघोळ, घराची

(पान २ वर...)

## पीक विम्याचे ट्रिगर हटवल्याने दुष्काळात शेतकऱ्यांची कोंडी

### डॉ.ज्योती मेटेंचा इशारा खरा ठरला

**बीड | सत्यवादी**

राज्यातील यंदाच्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सुधारित पीक विमा योजनेतील तीन ट्रिगर रद्द करण्याचा २०२५ मध्ये घेतलेला निर्णय आता शेतकरी आणि शासन दोघांसाठीही अडचणीचा ठरत असल्याचे समोर आले आहे. दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या दुष्काळ निवारण उपसमितीच्या बैठकीत पीक विमा योजनेतील या बदलांमुळे निर्माण झालेल्या

(पान २ वर...)



## ५३ हजाराचे इंजेक्शन मिळणार मोफत!



### आ.धस यांच्या प्रयत्नाने आष्टी ग्रामीण रुग्णालयात तीव्र हार्ट अटॅकवरील उपचार पद्धतीचा शुभारंभ

**आष्टी | सत्यवादी**

आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये तीव्र हार्ट अटॅक आल्यानंतर द्यावयाचे इंजेक्शन उपलब्ध झाले असून आणि उपचाराचे संयंत्र कार्यान्वित करण्यात आले आहे अशा पद्धतीचे उपचार करणारे ग्रामीण रुग्णालय बीड जिल्ह्यात एकमेव रुग्णालय ठरले आहे काल दि.०७ ऑक्टोबर रोजी ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली

(पान २ वर...)

## सहा वर्षांपासून फरार आरोपी शिवाजीनगर पोलिसांच्या जाळ्यात



**बीड | सत्यवादी**

शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या शस्त्र कायदा प्रकरणात मागील सुमारे सहा वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला शिवाजीनगर पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेऊन अटक केली. कुंदनसिंग जागुसिंग जुन्नी (रा. महासांगवी रोड, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २८९/२०२०, कलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून कुंदनसिंग जुन्नी हा पोलिसांना चकवा देत फरार होता. त्याचा शोध घेण्यासाठी शिवाजीनगर पोलिसांकडून सातत्याने प्रयत्न सुरू होते. दरम्यान, आरोपीबाबत मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी शोधमोहीम राबवून

(पान २ वर...)

## जुगाराचा मटका पो.नि. बल्लाळांनी फोडला!

### दोन कारवायांत दीड लाखाचा माल जप्त

### दोघांवर गुन्हा दाखल

**बीड | सत्यवादी**

बीड शहरातील अवैध मटका व जुगार व्यवसायाला आळा घालण्यासाठी शिवाजीनगर पोलिसांनी धडक कारवाई करत दोन स्वतंत्र कारवायांमध्ये रोख रकमेसह मोटारसायकल व जुगाराचे साहित्य असा एकूण ₹१ लाख ५४ हजार ३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई ६ ऑक्टोबर रोजी धानोरा रोड येथील टी-पॉईंट परिसरात करण्यात आली.



पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या सूचनेनुसार, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. पहिल्या कारवाईत रफीक बेग चाँद बेग याच्याकडून ₹२ हजार १३० रुपये रोख, चिठ्ठी बुक, कार्बनचा तुकडा व काळ्या रंगाचा बॉलपेन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई सायंकाळी सुमारे ५.४५ वाजता करण्यात आली.

त्यानंतर सायंकाळी सुमारे ७.१५ वाजता करण्यात आलेल्या

(पान २ वर...)

पान १ व ४ वरुन...

## दाहकता समजण्यासाठी पथकाने

व शेतकरी कल्याण मंत्रालयाने यासंदर्भात अधिकृत आदेश जारी केला आहे. एकूण ११ सदस्यांची ३ पथके करण्यात आली असून, या पथकांकडून दररोज ८ जिल्ह्यांचा आढावा घेतला जाणार आहे. हे पथक ज्या गावात जात आहे त्याच गावात त्यांनी मुक्काम करावा, जेणेकरुन त्यांना तेथील दुष्काळाची, शेतकऱ्यांची परिस्थिती लक्षात येईल. पथकातील मोठमोठ्या अधिकाऱ्यांनासुद्धा अलिशान हॉटेलमध्ये न थांबता गरीब शेतकऱ्यांच्या गावातील घरात रहावे तेंव्हाच

या पाहणीदरम्यान केंद्रीय पथकाकडून शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान, पाण्याची उपलब्धता, पाणीटंचाईची स्थिती, शेतीवर झालेला परिणाम तसेच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या अन्य अडचणींचा क्षेत्रीय स्तरावर आढावा घेतला जाणार आहे. त्यामुळे राज्य सरकारकडून केंद्राकडे करण्यात आलेल्या मदतीच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष परिस्थितीचे चित्र केंद्रासमोर स्पष्ट होण्यास मदत होणार आहे. या दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीसाठी केंद्र सरकारने ११ सदस्यांचे आंतरमंत्रालयीन पथक नियुक्त केले आहे. या पथकात कृषी व शेतकरी कल्याण, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग यांसह संबंधित विभागांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. मुक्तानंद अग्रवाल, संयुक्त सचिव (पीक विमा), कृषी व शेतकरी कल्याण विभाग, हे या केंद्रीय पथकाचे नेतृत्व करणार आहेत. पथकातील अधिकारी विविध जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष क्षेत्रभेटी घेऊन शेती आणि दुष्काळी परिस्थितीची पाहणी करणार आहेत.

केंद्रीय पथकाचे तीन स्वतंत्र गट करण्यात आले आहेत. या तीन पथकांकडून राज्यातील विविध विभागांतील दुष्काळग्रस्त जिल्ह्यांना भेटी देऊन परिस्थितीचा आढावा घेतला जाणार आहे.

**असे असणार पथक**

**पथक क्रमांक १**

पश्चिम महाराष्ट्रातील नगर, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यांची पाहणी करणार आहे.

**पथक क्रमांक २**

मराठवाड्यातील संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांना भेट देणार आहे.

**पथक क्रमांक ३**

विदर्भातील नागपूर, यवतमाळ जिल्ह्यांसह लगतच्या टंचाईग्रस्त भागांची पाहणी करणार आहे. हे पथक त्या-त्या भागातील पावसाची स्थिती, पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणींची प्रत्यक्ष माहिती घेणार आहे.

**प्रत्यक्ष पाहणीला महत्त्व**

दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करताना केवळ प्रशासकीय अहवालांपेक्षा प्रत्यक्ष क्षेत्रभेटीला महत्त्व दिले जाते. केंद्रीय पथकाकडून शेतकरी, स्थानिक प्रशासन आणि संबंधित यंत्रणांकडून परिस्थितीची माहिती घेतली जाण्याची शक्यता आहे. तसेच पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीची तीव्रता आणि दुष्काळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे मूल्यांकन केले जाणार आहे. यामुळे केंद्राकडून महाराष्ट्राला मिळणाऱ्या मदतीला गती आणि वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## सरकार लोकांना

रेपो दरात वाढ केली आहे.

आरबीआयच्या चलनविषयक धोरण समितीच्या तीन दिवसीय बैठकीनंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी ७ ऑक्टोबर रोजी नव्या व्याजदरांची घोषणा केली. महागाईचा दबाव वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

**महागाईचा अंदाज वाढवला**

आरबीआयने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी किरकोळ महागाईचा अंदाज ५.० टक्क्यांवरून ५.२ टक्के केला आहे. दुसरीकडे, याच कालावधीतील देशाच्या आर्थिक विकासाचा म्हणजेच वाढीचा अंदाज ६.७ टक्क्यांवरून ७.१ टक्के करण्यात आला आहे.

**व्याजदर कपातीला तूर्त ब्रेक**

आरबीआयने आपल्या धोरणात्मक भूमिकेत बदल करत 'कॅलिब्रेटेड टाइटनिंग' अर्थात परिस्थितीनुसार टप्प्याटप्प्याने आर्थिक धोरण कडक करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे नजीकच्या काळात व्याजदरात कपात होण्याची शक्यता कमी झाली आहे. आगामी बैठकींमध्ये परिस्थितीनुसार दर स्थिर ठेवण्याबरोबरच आणखी वाढीची शक्यताही व्यक्त केली जात आहे.

रेलिगेअर ब्रोकिंगचे वरिष्ठ उपाध्यक्ष (संशोधन) अजित मिश्रा यांच्या मते, ०.२५ टक्के दरवाढीची अपेक्षा होती; मात्र आरबीआयच्या धोरणात्मक भूमिकेतील बदल अधिक महत्त्वाचा आहे. महागाई नियंत्रणाला सध्या सर्वोच्च प्राधान्य दिले जात असल्याचे त्यातून स्पष्ट होते. कोटक महिंद्रा बँकेच्या मुख्य अर्थतज्ज्ञ उपासना भारद्वाज यांच्या मते, आगामी काळात व्याजदरात आणखी ०.२५ ते ०.५० टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे. डीबीएस बँकेच्या वरिष्ठ अर्थतज्ज्ञ राधिका राव यांनीही महागाईशी संबंधित धोके अधिक खोलवर रुजू नयेत, यासाठी आरबीआयने आपली भूमिका कडक केली असल्याचे मत व्यक्त केले आहे.

**कर्जदारांच्या वर परिणाम**

रेपो दरवाढीचा परिणाम बँकांच्या कर्जदारांवर झाल्यास नवीन कर्ज घेणाऱ्यांसह फ्लोटिंग व्याजदरावर कर्ज फेडणाऱ्या ग्राहकांच्या मध्ये वाढ होऊ शकते. त्यामुळे गृहकर्ज, वाहनकर्ज आणि वैयक्तिक कर्ज घेणाऱ्यांना आगामी काळात अधिक आर्थिक भार सहन करावा लागू शकतो.

## बीड शहरातील पाणी टंचाईसह

देण्यात आला. भाजपच्या बीड नगरपरिषद गटनेत्या डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह नगरसेवक व उमेदवारांनी आपल्या प्रभागातील विविध समस्यांची माहिती प्रशासनाला दिली. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नळजोडणी नसलेल्या तसेच टंचाईग्रस्त भागात अधिकृत टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा करावा, नवीन पाईपलाईनसाठी डीपीसीकडून तातडीने निधी मंजूर करून घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

टँकर वितरणातील गैरप्रकार रोखण्यासाठी सर्व टँकर्सवर जीपीएस व क्यूआर कोड प्रणाली अनिवार्य करावी, तसेच शाहूनगर, बार्शी रोड व धानोरा रोड येथील पाणी भरणा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवून कडक देखरेख ठेवावी, अशी मागणीही करण्यात आली. अमृत अटल पाणीपुरवठा योजनेतील प्रलंबित क्रॉसिंगची कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली.

पालिकेचा वाढता वीज खर्च कमी करण्यासाठी 'महाऊर्जा'च्या सहकार्याने समनापूर रोडवरील जागेवर चार कोटी रुपयांचा सौरऊर्जा प्रकल्प तातडीने राबवावा, अशी मागणी करण्यात आली. शहरातील बंद बोअरवेल, हातपंप व मोटारपंप दुरुस्त करून पाणी उपलब्ध करून द्यावे, आगामी नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बंद पथदिवे दुरुस्त करावेत आणि मंजूर सोलर मिनी हायमास्ट तातडीने बसवावेत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. स्वच्छता विभागाने सर्व प्रभागांत नियमितपणे घंटागाड्या पाठवाव्यात तसेच नाल्यांमधून काढण्यात आलेला कचरा तातडीने उचलावा. पाण्याची भीषण टंचाई संपेपर्यंत सिमेंट रस्ते व नाल्यांच्या बांधकामांना तात्पुरती स्थगिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली. टंचाईच्या काळात दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करून तक्रार निवारण कक्ष सुरू करावा, अशीही मागणी भाजपच्या शिष्टमंडळाने केली.

यावेळी भाजपच्या बीड नगरपरिषद गटनेत्या डॉ. सारिकाताई क्षीरसागर, डॉ. ज्योतीताई घुंबरे, माजी नगरसेवक गणेश वाघमारे, माजी उपाध्यक्ष नसीर अन्सारी, नगरसेवक राणा चौहाण, शुभम धुत, ॲड. नागेश तांबारे, राजेंद्र गुजर, राहुल गुरखुदे, सनी माने, मुन्ना गायकवाड, नंदू पिंगळे, डॉ. लक्ष्मण जाधव, अनिल चांदणे, बाळासाहेब घोडके, आमेर सिद्दीकी, शारेक जकेरिया, भाजप युवा मोर्चाचे शहराध्यक्ष शुभम कातांगळे, अमर विद्यागर, राजू महुवाले, सुशिल जाधव, डॉ. रमेश शिंदे, मिलिंद ठोकळ, किरण बेदरे, शिवराज शिरसाट आदी उपस्थित होते.

**पाणीपुरवठा, विद्युत, स्वच्छता विभागप्रमुखांना धारेवर धरले**

डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांची भेट घेतल्यानंतर सर्व विभागप्रमुखांना बैठकीसाठी बोलावण्यात आले. यावेळी नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील समस्यांचा पाढा प्रशासनासमोर वाचला. त्यानंतर डॉ. क्षीरसागर यांनी पाणीपुरवठा, विद्युत व स्वच्छता विभागप्रमुखांना धारेवर धरत कामकाजात तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांच्या समस्या सोडविण्यात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर थेट कारवाई करावी, अशी सूचनाही त्यांनी मुख्याधिकाऱ्यांना केली.

## स्लॅब भरण्याच्या कामासाठी घरातून

नुरखाँ (वय ४२, रा. तेलगाव नाका, शिफा कॉलनी, पेठबीड, बीड) हे २६ सप्टेंबर २०२६ रोजी नेहमीप्रमाणे एकतानगर परिसरात स्लॅब भरण्याच्या मशीनवर काम करण्यासाठी गेले होते. रात्री सुमारे ९ वाजेपर्यंत ते घरी परतणे अपेक्षित होते. मात्र, ते घरी न परतल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी नातेवाईक, मित्र तसेच कामावरील मजूर आणि मालकांकडे चौकशी करून शोध घेतला. तरीही त्यांचा ठावठिकाणा लागला नाही.

याबाबत त्यांचा मुलगा शेख अल्ताफ जाफर (वय २०) यांच्या फिर्यादीवरून बीड शहर पोलीस ठाण्यात २ ऑक्टोबर २०२६ रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक २१५/२०२६, कलम १४०(३) बीएनएस अन्वये नोंद करण्यात आली आहे. बेपत्ता शेख जाफर यांचा रंग सावळा, चेहरा गोल, उंची अंदाजे ५ फूट ४ इंच, शरीरयष्टी सडपातळ असून केस बारीक आहेत. ते मिशी ठेवतात; दाढी नाही. त्यांचे नाक सरळ असून ते हिंदी व मराठी भाषा बोलतात. बेपत्ता होताना त्यांच्या अंगात पांढऱ्या रंगाचा फुल शर्ट, काळ्या रंगाची जिन्स पॅन्ट व पायात चप्पल होती. सदर वर्णनाची व्यक्ती कोणास आढळल्यास किंवा त्यांच्याबाबत काही माहिती मिळाल्यास तातडीने बीड शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**संपर्क : पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर ९८२२५३३८५७**

**तपास अधिकारी : पोलीस हवालदार ए. जे. सानप ७५८८३३७७१८**

## पीक विम्याचे ट्रिगर

परिस्थितीवर गंभीर चर्चा झाल्याचे माध्यमांमधून समोर आले आहे.

सुधारित पीक विमा योजनेत हंगामातील नुकसान अथवा दुष्काळाच्या परिस्थितीत लागू होणारे ट्रिगर यापूर्वी महत्त्वाचे ठरत होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानंतर पात्र शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रीम नुकसानभरपाई देण्याची तरतूद होती. मात्र, २०२५ पासून हे ट्रिगर रद्द करून पीक विमा भरपाई मुख्यत्वे पीक कापणी प्रयोगाच्या आधारे निश्चित करण्याची पद्धत लागू करण्यात आली. त्यामुळे यंदाच्या तीव्र दुष्काळात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीच्या अग्रीम मदतीपासून वंचित राहण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे, २०२५ मध्येच सुधारित पीक विमा योजनेतील ट्रिगर रद्द करण्याच्या निर्णयामुळे भविष्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते, ही बाब डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यांनी मुख्यमंत्री, कृषिमंत्री तसेच संबंधित यंत्रणांना निवेदन देऊन या निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी केली होती. मात्र, त्यावेळी या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देण्यात आले नाही.

आज राज्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळाची तीव्रता वाढलेली असताना त्याच मुद्द्यावर दुष्काळ निवारण उपसमितीच्या बैठकीत चर्चा होणे, ही बाब त्यावेळी केलेल्या मागणीचे गांभीर्य अधोरेखित करणारी आहे. ट्रिगर रद्द केल्यामुळे शेतकऱ्यांना तातडीची विमा मदत मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या असून, दुसरीकडे शासनालाही दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना विमा योजनेच्या माध्यमातून अपेक्षित मदत उपलब्ध करून देताना अडचणी येत असल्याचे बैठकीतील चर्चेतून स्पष्ट होत आहे. विधिमंडळ अधिवेशनातही या निर्णयावर ठोस कार्यवाही झाली असती आणि शिवसंग्रामच्या निवेदनाची त्यावेळी गांभीर्याने दखल घेऊन पीक विमा योजनेतील ट्रिगरबाबत फेरविचार केला असता, तर आजची परिस्थिती टाळता आली असती, अशी भूमिका शिवसंग्रामकडून व्यक्त करण्यात येत आहे.

यंदाच्या दुष्काळी संकटाच्या पार्श्वभूमीवर शासनाने पीक विमा योजनेतील ट्रिगर रद्द करण्याच्या निर्णयाचा फेरविचार करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पुन्हा एकदा पुढे आली आहे.

## ५३ हजाराचे इंजेक्शन

त्यावेळी नगराध्यक्ष जिया बेग, माजी सभापती आदिनाथ सानप, रुग्णकल्याण समिती सदस्य प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, सनियंत्रण समिती सदस्य जालिंदर पोकळे उपस्थित होते

यावेळी अधिक माहिती देताना ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे म्हणाले की, एखाद्या व्यक्तीला तीव्र हार्ट अटॅक आल्यास या उपचार पद्धतीने रक्ताच्या गुठळ्या पातळ करण्यात येतात तीव्र हार्ट अटॅक असल्यामुळे सुरुवातीच्या एक तासात अशा पद्धतीचा उपचार दिल्यास पेशंट जगू शकतो या उपचार पद्धतीमध्ये एक इंजेक्शन उपलब्ध करून देण्यात आले असून त्याची बाजारी किंमत ५३ हजार रुपये आहे परंतु ते ग्रामीण रुग्णालयामध्ये मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे तीव्र हार्ट अटॅकचा रुग्ण दाखल झाल्यानंतर त्याची तपासणी करून थ्रोंबोलायसिस पद्धतीने उपचार करून डीफॅब्रिलेटर,सिरीज पंप इत्यादी व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली असून यासाठी स्वतंत्र कक्ष आणि स्वतंत्र बेड उपलब्ध करून देण्यात आले आहे या पद्धतीने उपचार करण्यासाठी ग्रामीण रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी आणि स्टाफ नर्सेस या सर्वांना प्रशिक्षण देण्यात आले आहे त्यामुळे हार्ट अटॅक सदृश्य लक्षणे दिसून येत असलेल्या रुग्णांनी आणि त्याच्या नातेवाईकांनी तात्काळ ग्रामीण रुग्णालयाकडे संपर्क करावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले आहे.

## महिन्यात फक्त

स्वच्छता यासह वृद्ध, लहान मुले, रुग्ण आणि विविध छोट्या व्यवसायांच्या पाण्याच्या गरजा कशा भागणार, याचे उत्तर प्रशासनाला द्यावे लागणार आहे. पाणी जपून वापरण्याचे आवाहन करणे आणि पाणीपुरवठ्याचे दिवस मोठ्या प्रमाणात कमी करणे, या दोन बाबींमध्ये फरक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पाणीटंचाईच्या परिस्थितीत गळती रोखणे, अनधिकृत पाणीउपसा थांबवणे, वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे, उपलब्ध जलसाठ्याचे शास्त्रीय नियोजन करणे आणि पर्यायी जलस्रोतांचा शोध घेणे, अशा उपाययोजनांवर भर देण्याची मागणी होत आहे.

परळी शहरासाठी पाणीटंचाईचा प्रश्न नवीन नाही. उन्हाळा आणि पाणीटंचाईचे संकट आले की पाणीपुरवठ्याच्या वेळापत्रकात बदल, कपात आणि नागरिकांची पाण्यासाठी धावपळ हे चित्र वारंवार पाहायला मिळते. शहराची लोकसंख्या आणि पाण्याची मागणी वाढत असताना भविष्यातील पाण्याचे नियोजन त्याच प्रमाणात झाले आहे का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. दरवर्षीच्या तात्पुरत्या उपायांऐवजी शहरासाठी दीर्घकालीन जलआराखडा तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**टँकरचा भार कोण उचलणार?**

महिन्यात केवळ तीन दिवस नळाला पाणी मिळणार असल्यास अनेक कुटुंबांना पर्यायी पाण्याच्या साधनांवर अवलंबून राहावे लागू शकते. मोठ्या पाण्याच्या टाक्या असलेल्या कुटुंबांना काही प्रमाणात व्यवस्था करता येईल; मात्र गरीब, मध्यमवर्गीय, भाडेकरू आणि छोट्या घरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आली तर त्याचा अतिरिक्त आर्थिक भार नागरिकांवर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याच्या कपातीसोबतच पर्यायी व्यवस्थेचे नियोजन प्रशासनाने स्पष्ट करणे आवश्यक ठरणार आहे.

**कायमस्वरूपी जलआराखड्याची गरज**

परळी शहरातील पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी प्रशासनाने पर्यायी जलस्रोत निश्चित करणे, पाणीपुरवठा योजनेतील गळती व अपव्यय रोखणे, अनधिकृत पाणीउपसा थांबवणे, जलसाठवण क्षमता वाढवणे, पावसाचे पाणी अडवून भूजल पुनर्भरणाला चालना देणे आणि आगामी पाच-दहा वर्षांचा स्वतंत्र शहर जलआराखडा तयार करणे, या उपाययोजनांवर तातडीने काम करण्याची गरज आहे.

## जुगाराचा मटका पो.नि.

दुसऱ्या कारवाईत सुलतान खान सदाद पठाण याच्याकडून ₹१ हजार ९०० रुपये रोख, चिठ्ठी बुक, कार्बनचा तुकडा, काळ्या रंगाचा बॉलपेन तसेच ₹१ लाख ५० हजार रुपये किमतीची होंडा मोटारसायकल (एमएच २३ बीई ९५८२) असा एकूण ₹१ लाख ५१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दोन्ही प्रकरणांत संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर धोत्रे, पोहेकॉ रवींद्र गोवर्धन आघाव, पोलीस शिपाई सुरज राजेंद्र वाघमारे व राजाभाऊ जाधव यांनी केली. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध जुगार, मटका व इतर बेकायदेशीर व्यवसायांविरुद्ध यापुढेही सातत्याने कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## सहा वर्षांपासून फरार आरोपी

त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्यास अटक करण्यात आली.

ही कारवाई पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष राऊत, पोलीस हवालदार रवींद्र आघाव व पोलीस हवालदार शिवदास घोलप यांच्या पथकाने केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि पोलीस उपअधीक्षक नवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## औरंगाबाद विभाग पदवीधर

आहे. बिलोली तालुक्यातील सिमावर्ती भागातील सामाजिक कार्यकर्ते राजु पाटील शिंपाळकर यानी शालेय जिवना पासुन आपल्या समाजिक कार्याच्या वाटचालीची सुरवात करत आसतना शेतकरी,शेतमजुर निराधार आशा विविध दिनदुबळ्या गोरगरीब वंचित घटकाना न्याय मिळुन देण्यासाठी अंगी साकारलेली संघर्षाची धडपड हजारो गरजवंताना फायदेशीर ठरली आहे. त्याच्या सामाजिक कार्याची वाटचाल पुढे नेत आसताना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणुन ज्याकड आदराने बघितल जात त्या पत्रकारीता क्षेत्रात गेल्या दिड शतका पासुन निर्भिड पणे काम करीत आसताना त्यानी वंचित घटकाना आपल्या लेखणीच्या माध्यमातून न्याय मिळुन देण्यासाठी सातचा प्रयत्न आजही वाखण्याजोग आहे. सामाजिक क्षेत्राला वाहुन घेत आसताना शेतकऱ्यांवर कोसळलेले अतिवृष्टी व गारपिठ असे वेगवेगळे नैसर्गिक संकट आसतील या शेतकरी कर्जबाजारी आत्महत्या आसतील त्या त्या वेळेस शेतकऱ्यांना अर्थिक मदत मिळवुन देण्यासाठी आंदोलन उपोषणे करून शासन- प्रशासन दरबारी पाठपुरावे करून शेतकऱ्यांना अर्थिक दिलासा देण्याचा त्यानी आज पर्यंत कसोसीने प्रयत्न केले.

## आ.सतीश चव्हाण यांच्या संपर्कासह

मतदारांची नोंदणी, नव्या मतदारांशी संपर्क, कार्यकर्त्यांच्या बैठका आणि स्थानिक पातळीवरील समन्वय यामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक हालचालींना वेग आला आहे.छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड आणि हिंगोली या आठ जिल्ह्यांचा समावेश असलेल्या मतदारसंघात व्यापक संपर्काचे जाळे उभारणे हे मोठे आव्हान असते. या पार्श्वभूमीवर दीर्घकाळ मतदारसंघाशी असलेला संपर्क आणि स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांचे जाळे आगामी निवडणुकीत महत्त्वाचे ठरणार असल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे.

**शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा उल्लेख**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून आ. चव्हाण यांनी शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविल्याचे त्यांच्या समर्थकांकडून सांगण्यात येते. शिक्षण क्षेत्राशी संबंधित प्रश्न, शिक्षक व पदवीधरांच्या अडचणी तसेच विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांना त्यांनी सातत्याने प्राधान्य दिल्याचा दावा करण्यात येत आहे.पदवीधर मतदारसंघ हा केवळ राजकीय प्रतिनिधित्वाचा मतदारसंघ नसून शिक्षण, रोजगार आणि सामाजिक प्रश्नांशी थेट संबंधित मतदारसंघ असल्याने या प्रश्नांवर सातत्याने काम करणाऱ्या नेतृत्वाला मतदारांकडून प्रतिसाद मिळतो, असा विश्वास त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केला जात आहे.

**चौथ्या विजयासाठी एकजुटीचे आवाहन**

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदवीधर मतदारांशी थेट संवाद वाढविणे, मतदार नोंदणीबाबत जनजागृती करणे, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढविणे आणि प्रत्येक तालुक्यात संघटनात्मक पातळीवर प्रभावी संपर्क ठेवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.आ. सतीशराव चव्हाण यांच्या चौथ्या विजयासाठी पदवीधर मतदार, कार्यकर्ते आणि समर्थकांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने काम करावे, असा सूर समर्थकांमध्ये आहे. सातत्यपूर्ण जनसंपर्क, मतदारांशी असलेले नाते आणि मतदारसंघातील संघटनात्मक बांधणी या बाबींच्या जोरावर आगामी निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्धार त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.दरम्यान, छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघासाठी ५ ऑक्टोबर २०२६ रोजी आ सतिश चव्हाण हे आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

## बीडच्या दुष्काळी परिस्थितीवर

जिल्ह्यात दुष्काळाची पाहणी करण्यासाठी दौऱ्यावर होत्या, मागील आठवड्यात त्यांनी परळी, अंबाजोगाई, केज चा दौरा केल्यानंतर कालपासून त्यांनी बीड, पाटोदा, वडवणी, धारूर, माजलगांव, गेवराई या भागात पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. एकंदरीत दौऱ्यात शेतकऱ्यांनी सांगितलेले अनुभव व परिस्थिती यावर त्यांनी आज जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी यांच्यांशी सविस्तर चर्चा केली.

**जायकवाडीचे पाणी पाटोद्याला मिळावे**

येत्या काही दिवसांत जिल्ह्यात पाण्याचे मोठे दुर्भिक्ष जाणवणार आहे, त्यादृष्टीने आपल्याला तयार रहावे लागेल. जायकवाडीतून पाटोदा तालुक्याला जीपीएस लावून पाणी पुरवठा व्हावा. यात गोंधळ होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी सूचना त्यांनी केली. रोजगार हमी योजनेतून नद्यांचे खोलीकरण, रुंदीकरण अशी कामे करावीत. भविष्यात पाणी टंचाई होणार नाही अशा पध्दतीने नियोजन करावे असं त्यांनी सांगितलं.

**पाणी नसणाऱ्या प्रकल्पाचे ऑडिट करा**

जिल्ह्यातील ज्या प्रकल्पात आजच्या स्थितीत अजिबात पाणी नाही अशा प्रकल्पाचे ऑडिट करा जेणेकरून पावसाळ्यात पाणी थांबेल आणि अडचण दूर होईल. बांधकामासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी लागते गरज भासल्यास अशा कामांना स्थगिती देण्याचा विचार करावा असेही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करताना सांगितले.

## चिंचवणमध्ये रात्रीच्या

ढाल मिळवण्यासाठी या व्यक्तीने प्रामाणिक शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध विविध वरिष्ठ कार्यालयांमध्ये खोट्या आणि बनावट तक्रारी दाखल करण्याचा सपाटा लावला आहे, जेणेकरून प्रशासनावर मानसिक दबाव निर्माण करून सरकारी जमीन कायमस्वरूपी हडपता येईल.

**जिल्हा प्रशासनाला ४ कलमी मागण्यांचे अल्टिमेटम; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा!**

या महाघोटाळ्याप्रकरणी इंजि. सादिक इनामदार यांनी मा. जिल्हाधिकारी (बीड), मा. अप्पर जिल्हाधिकारी (अंबाजीगाई) आणि मा. उपजिल्हाधिकारी (माजलगाव) यांना पुरावे व सातबाऱ्यासह अधिकृत तक्रार अर्ज सादर केला असून खालील कडक मागण्या केल्या आहेत: १. तात्काळ फौजदारी गुन्हा (): शासकीय जमिनीची फसवणूक करणे आणि बेकायदेशीर ताबा मिळवल्याबद्दल आरोपी अंगद बडे याच्यावर भारतीय न्याय संहिता (), २०२३ आणि सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायद्यांतर्गत तात्काळ गुन्हा नोंदवून अटक करावी.

२. अतिक्रमण निष्कासित करणे: चिंचवन येथील गट क्र. ५२१ मधील त्रिमूर्ती मशनरी व हार्डवेअर हे बेकायदेशीर दुकान पोलीस बंदोबस्तात तात्काळ जमीनदोस्त () करून जमीन शासनाच्या ताब्यात घ्यावी. ३. कर्मचाऱ्यांना संरक्षण: भू-माफियाच्या खोट्या तक्रारींना बळी न पडता स्थानिक कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण द्यावे.

## वेतन मंजुरीचा टॅब बंद पडल्याने

प्रश्न कर्मचाऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. या गंभीर प्रश्नावर शिवसेना (शिंदे गट) अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाप्रमुख मोहम्मद अझरुद्दीन (ए. एस. गोलू) यांनी आक्रमक भूमिका घेत जिल्हा परिषद बीडच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. तांत्रिक अडथळा हा शिक्षकांच्या वेतनाला अडथळा ठरू नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. शासकीय ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक अडचणीमुळे वेतन मंजुरीची प्रक्रिया थांबली असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, प्रशासकीय यंत्रणेतील तांत्रिक बिघाडाची शिक्षा शिक्षक-कर्मचाऱ्यांना का? असा सवाल उपस्थित होत आहे. वेळेत काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेची असताना त्याचा आर्थिक फटका कर्मचाऱ्यांना बसणे अन्यायकारक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

घटस्थापना, नवरात्र आणि त्यानंतर येणाऱ्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शिक्षकांचे वेतन प्रलंबित राहिल्याने त्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. पगाराच्या पैशावर अनेक कुटुंबांचे महिन्याचे आर्थिक नियोजन अवलंबून असते. त्यामुळे वेतन रखडल्याने अनेक कुटुंबांचे बजेट कोलमडण्याची शक्यता आहे. निवेदनात शिक्षणाधिकाऱ्यांच्या लॉगिनवरील वेतन मंजुरीचा ऑनलाइन 'टॅब' तातडीने सुरू करण्यासाठी वरिष्ठ कार्यालय व संबंधित तांत्रिक विभागाशी संपर्क साधण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक सर्व शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सप्टेंबरचे प्रलंबित वेतन सण-उत्सवांपूर्वी त्यांच्या बँक खात्यात जमा करावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रश्नावर शिक्षण विभागाने तातडीने हस्तक्षेप करून सकारात्मक निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा मोहम्मद अझरुद्दीन (ए. एस. गोलू) यांनी दिला आहे. त्यामुळे आता शिक्षण विभाग या प्रश्नावर किती तत्परतेने निर्णय घेतो, याकडे शिक्षक-कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त आदर्श

सर्वांगीण विकासासाठी रिझवाना कादरी मॅडम यांनी केलेले कार्य वाखाणण्याजोगे आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन कादरी फाउंडेशनने त्यांना या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले आहे. या यशामुळे संपूर्ण शाळा परिवार व परिसरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. या विशेष सत्कार प्रसंगी मिलिया प्राथमिक मुले शाळेचे आदर्श मुख्याध्यापक शेरखान सर यांनी कादरी मॅडम यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सोहळ्यास मिलिया प्राथमिक शाळेतील शिक्षक फैसल सर, तसेच शिक्षिका बीबी हाजरा, साबिहा खतीब, शाझिया खान, निशाद अंजुमन आणि मसरत सुलताना यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित सर्व शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी कादरी मॅडम यांचे अभिनंदन करून आनंद व्यक्त केला.

# मिल्लीया महाविद्यालयात राज्यस्तरीय दुर्लक्षित क्रांतिकारी शोध निबंध स्पर्धा

**बीड । सत्यवादी**

येथील मिल्लिया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने शनिवार दि.२९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सातव्या राज्यस्तरीय भारतीय 'दुर्लक्षित क्रांतिकारी' शोध निबंध स्पर्धेचा ऑनलाइन बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला.कार्यक्रमाचे प्रस्तावीक इतिहास विभाग प्रमुख डॉ. शेख हुसेन यांनी केले, त्यांनी सांगितले की क्रांतिकारी ज्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता, इतिहासामध्ये त्यांच्या जीवनकार्याचे व्यवस्थित वर्णन आहे परंतु त्यांचे कार्य लोकांना माहीत नाही अशा भारतीय दुर्लक्षित क्रांतीकारकाविषयी त्यांचा जन्म, भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांची भूमिका, त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना ही माहिती प्रकाशात आणण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातील अनेक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन भाग घेतला व आपला शोध निबंध पाठवला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलियास फाजील होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, इतिहास हा केवळ भूतकाळातील घटनांचा अभ्यास नसून वर्तमान समजून घेण्यासाठी आणि उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी महत्त्वाचा विषय आहे. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वाढते, आत्मविश्वास विकसित होतो आणि अभ्यासाची सकारात्मक स्पर्धात्मक भावना निर्माण होते. विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी होऊन आपल्या ज्ञानाचा विकास करावा. 'दुर्लक्षित क्रांतिकारी' या विषयाच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्यातील व इतिहासातील तुलनेने दुर्लक्षित राहिलेल्या व्यक्तींच्या कार्याचा शोध घेण्यास विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, तसेच संशोधनाची आवड निर्माण व्हावी हा या स्पर्धेचा उद्देश आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धेतील उत्कृष्ट विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. सय्यद कुलसुम सय्यद तौफिक (डॉ. रफीक झकारिया कॉलेज फॉर वुमेन, छत्रपती संभाजीनगर) यांनी पटकावला. त्यांना रोख १,५०० रुपये व ट्रॉफी देण्यात आली. द्वितीय क्रमांक कु.शेख सदफ एजाज (मिल्लिया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय, बीड) व सिद्धार्थ श्रीकिसन वाघमारे (सौ.के.एस.के. महाविद्यालय, बीड) यांनी मिळविला. दोन्ही विजेत्यांना रोख १,००० रुपये व प्रमाणपत्र देण्यात आले. तृतीय क्रमांक कु. सानिया मिसबाह काशिफ (चिश्तिया कॉलेज, खुलताबाद) कु. पायल गोरख कांबळे (आर्ट्स कॉलेज, बिडकीन)कु. रझवी झैनब फातिमा, उम्मे सलमा खान आणि इक्रा जुनैरा (डॉ. रफीक झकारिया कॉलेज फॉर वुमेन, औरंगाबाद) यांनी मिळविला. त्यांना प्रत्येकी रोख ७०० रुपये व प्रमाणपत्र देण्यात आले. उत्तेजनार्थ पारितोषिक कु. मोमीन अकसा फातिमा रझीउद्दीन (मिल्लिया महाविद्यालय, बीड), कु. सय्यद मिसबाह अंजुम सय्यद निसार (डॉ. रफीक झकारिया कॉलेज फॉर वुमेन, औरंगाबाद) आणि कु. प्रांजल गोरख कांबळे (प्रतिष्ठान कॉलेज, पैठण) यांना प्रत्येकी रोख ५०० रुपये व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तसेच उत्कृष्टता ट्रॉफीचा मान डॉ. रफीक झकारिया कॉलेज फॉर वुमेन, छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयाला मिळाला.

आपल्या लोकांचा सत्यवादी



# परळी पाणी प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करा!

## जिल्हाधिकाऱ्यांची नगरसेवकांनी घेतली भेट; वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाकडे पाठपुराव्याची मागणी

**परळी । सत्यवादी**

शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, दरवर्षी निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईवर तात्पुरत्या उपाययोजना करण्याऐवजी शहरासाठी कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याची व्यवस्था उभी करावी, अशी ठाम मागणी नगर परिषद नगरसेवकांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे केली.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे विविध प्रशासकीय कामानिमित्त परळीत आले असता नगर परिषद नगरसेवकांनी तहसील कार्यालय येथे त्यांची भेट घेऊन शहराच्या पाणीप्रश्नावर सविस्तर चर्चा केली. यावेळी परळी शहराला भविष्यात भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर कायमस्वरूपी उपाययोजनांचा आराखडा तयार करून तो शासनाकडे सादर करण्याची मागणी करण्यात आली.

परळी शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची वाढती गरज लक्षात घेता सध्याची पाणीपुरवठा व्यवस्था अपुरी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा योजना तातडीने मंजूर करावी, तसेच या योजनेला शासनस्तरावर आवश्यक ती प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ठोस शिफारस करून सातत्याने पाठपुरावा करावा, अशी मागणी नगरसेवकांनी केली.

दरवर्षी उन्हाळा सुरू झाल्यानंतर परळीकरांना पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. पाणी उपलब्धतेचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात उपाययोजना केल्या जातात; मात्र यामुळे नागरिकांची समस्या कायमची सुटत नाही. त्यामुळे भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



परळीच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे आणि मंत्री पंकजा मुंडे यांच्या सूचनेनुसार शहराच्या पाणीप्रश्नावर शासनस्तरावर आवश्यक तो पाठपुरावा करण्यात येईल, असा सकारात्मक प्रतिसाद जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्याचे नगरसेवकांनी सांगितले.

**पाणीप्रश्नाकडे भविष्यातील आव्हान म्हणून पाहण्याची गरज**

परळीचा पाणीप्रश्न हा केवळ सध्याच्या उन्हाळ्यापुरता मर्यादित नसून, वाढत्या शहराच्या भविष्यातील गरजांशी संबंधित आहे. त्यामुळे उपलब्ध जलस्रोतांचे नियोजन, वाढीव पाणीपुरवठा योजना, आवश्यक जलसाठा आणि भविष्यातील लोकसंख्येचा विचार करून दीर्घकालीन आराखडा तयार करण्याची गरज व्यक्त होत आहे. "दरवर्षीची पाणीटंचाई आणि तात्पुरत्या उपाययोजनांचे चक्र थांबवून परळीकरांना पुरेसा व नियमित पाणीपुरवठा मिळण्यासाठी कायमस्वरूपी तोडगा काढणे आवश्यक आहे," अशी भूमिका नगरसेवकांनी यावेळी मांडली.

शासनाकडे याबाबत ठोस प्रस्ताव सादर करून त्याच्या मंजुरीसाठी सातत्याने पाठपुरावा केला जाणार असल्याचेही सांगण्यात आले.

## आष्टीत संत सेना महाराज यांची पुण्यतिथी साजरी

**आष्टी । सत्यवादी**

आष्टी शहरात श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थितांनी अभिवादन केले. या कार्यक्रमास नाभिक संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रविण कदम, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, भाजपचे माजी शहराध्यक्ष बाबुराव कदम, कैलास कदम, दिलीप कदम, अंबादास कदम, केंद्रशिक्षक अमोल कदम, प्रकाश कदम, बबन कदम, बाला कदम, अक्षय कदम, शरद राऊत, आकाश कदम, पवन कदम, लखन कदम, विनोद कदम, सागर कदम, हरी कदम, गोविंद कदम, राम कदम, ऋषी कदम, सार्थक कदम, नाना कदम यांच्यासह नाभिक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.संत सेना महाराज यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. समाजबांधवांनी एकत्र येत पुण्यतिथी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी केली.

# ब्रह्मगावच्या श्रृंगेरी देवी मंदिरात चोरी;दागिन्यांसह दानपेटी फोडली

## ६४ हजारांचा ऐवज लंपास

**आष्टी । सत्यवादी**

तालुक्यातील ब्रह्मगाव येथील श्रृंगेरी देवी मंदिरात अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारत देवीचे चांदीचे दागिने आणि दानपेटीतील रोख रक्कम असा एकूण ६४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. ही घटना शनिवारी (ता. ३) रात्रीच्या सुमारास घडली असून, आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ब्रह्मगाव येथील श्रृंगेरी देवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष विजय मारुती हराळ (वय ५२) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. मंदिरात देखभालीसाठी आणि राखणदार म्हणून बाळू निकाळजे यांची नेमणूक केलेली आहे. शनिवारी रात्री ११ ते १२ च्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी मंदिराच्या चॅनेल गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. रविवारी (ता. ४) सकाळी आठ वाजता मंदिराचे पुजारी कल्याण निंबाळकर यांना कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी तात्काळ हराळ यांना फोनवरून याची माहिती दिली. त्यानंतर हराळ यांनी सरपंच रोहिदास पवार यांच्यासोबत मंदिरात जाऊन पाहणी केली असता चोरीचा प्रकार समोर आला. चोरट्यांनी देवीच्या गाभाऱ्यात प्रवेश करून देवीच्या अंगावरील १५ हजार रुपयांचे १२ बेंटेक्सचे अलंकार, ४ हजार रुपयांचे २ बेंटेक्सचे टोप, ४० हजार रुपये किमतीचा एक चांदीचा गणपती, ३ हजार रुपयांच्या २ पितळी मूर्ती आणि २ हजार रुपयांच्या बेंटेक्सच्या दोन नथी असा एकूण ६४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. यासोबतच दानपेटीचे कडी कोयंडा आणि कुलूप तोडून त्यातील रोख रक्कमही पळवली आहे. दानपेटीत नेमकी किती रक्कम होती, हे मात्र समजू शकलेले नाही. याप्रकरणी विजय हराळ यांच्या फिर्यादीवरून आष्टी पोलिसांत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस हवालदार विकास जाधव करत आहेत.




# अल्पवयीनांच्या दुचाकीस्वारीकडे पोलिसांचे दुर्लक्ष!

## शाळा, ट्यूशन अन् मुख्य रस्त्यांवर बिनधास्त वाहने

**पाथरी । सत्यवादी**

पाथरी शहरातील शाळा, महाविद्यालये, ट्यूशन परिसर तसेच मुख्य रस्त्यांवर १८ वर्षांखालील मुले बिनधास्तपणे दुचाकी चालवताना दिसत आहेत. वाहन चालविण्याचा परवाना नसतानाही ही मुले भरधाव वेगाने दुचाक्या चालवत असून, त्यामुळे स्वतःसह इतर नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे शाळा व ट्यूशनच्या वेळेत रस्त्यांवर मोठ्या संख्येने मूला, मुलींची वर्दळ असते. अश्या वेळेतच दुचाकीस्वार दिसत असतानाही पोलिसांकडून प्रभावी तपासणी किंवा कारवाई होत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. नियमांची खुलेआम पायमल्ली होत असताना प्रशासन नेमके कोणत्या मोठ्या अपघाताची वाट पाहत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. अल्पवयीन मुलांच्या हातात दुचाकी देणाऱ्या पालकांनीही गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. काही पालक आपल्या मुलांना शाळा किंवा ट्यूशनला जाण्यासाठी दुचाकी देतात; मात्र वाहन चालविण्याचे वय आणि परवाना याबाबतचे नियम पाळले जात नसल्याचे चित्र आहे.




**अपघात झाल्यानंतरच कारवाई होणार का?**

मुख्य रस्त्यांवर भरधाव दुचाकी चालविणाऱ्या अल्पवयीन मुलांवर वेळीच नियंत्रण आणणे गरजेचे आहे. शाळा, ट्यूशन परिसर आणि गर्दीच्या रस्त्यांवर नियमित वाहन तपासणी करून अल्पवयीनांकडे दुचाकी देणाऱ्या पालकांवरही नियमानुसार कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# जिल्हास्तरीय शालेय किकबॉक्सिंग स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूलचे यश

**बीड । सत्यवादी**

जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सोमवार, दि. ५ रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय किकबॉक्सिंग स्पर्धेत देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूलच्या खेळाडूंनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत आपले वर्चस्व सिद्ध केले. या स्पर्धेत शाळेने तब्बल ४ सुवर्ण आणि १ रौप्यपदक पटकावून विभागीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले.

१४ वर्षांखालील वयोगटात सोनल कापसे हिने ५० किलो आतील, राजवर्धन चव्हाण याने ४२ किलो आतील, अर्णव वडमारे याने ३७ किलो आतील, तर राजरतन कापसे याने ४७ किलो आतील वजनगटात प्रतिस्पर्ध्यांवर मात करत प्रथम क्रमांक व सुवर्णपदक पटकावले. तर १७ वर्षांखालील अत्यंत चुरशीच्या ७० किलो आतील वजनगटात हर्षद शिरसाट याने द्वितीय क्रमांक मिळवत रौप्यपदकावर आपले नाव कोरले.

या सर्व यशस्वी खेळाडूंना शाळेचे क्रीडा शिक्षक तथा राष्ट्रीय खेळाडू मोसिम शेख यांचे मार्गदर्शन लाभले.विद्यार्थ्यांच्या या देदीप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे आणि प्राचार्या उमा जगतकर यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले, तसेच आगामी विभागीय किकबॉक्सिंग स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# न्यू हायस्कूल आंबेवडगाव येथे वन्यजीव सप्ताह उत्साहात संपन्न

**धारूर । सत्यवादी**

न्यू हायस्कूल आंबेवडगाव आणि वन विभाग व सामाजिक वनीकरण विभाग, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेत वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यावरण संवर्धन, वन्यजीवांचे संरक्षण तसेच विद्यार्थ्यांमध्ये मुक्या प्राण्यांप्रती संवेदनशीलता निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धारूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी ईश्वर घुनावत होते. प्रमुख पाहुणे म्हणून व्ही. एन. पवार, कांबळे, सर्पमित्र निखिल चिद्रवार, चंदू घुमरे, पत्रकार अनिल महाजन, अतुल शिनगारे आणि ईश्वर खामकर उपस्थित होते.वन्यजीव सप्ताहानिमित्त आयोजित चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पहिल्या गटात अनुष्का सूर्यकांत मुंडे हिने प्रथम, तेजस्विनी शानिक घोळवे हिने द्वितीय, तर देवसेना जगन्नाथ घोळवे हिने तृतीय क्रमांक मिळवला. दुसऱ्या गटात भक्ती घोळवे हिने प्रथम, सायली ज्योतिबा देवगडे हिने द्वितीय, तर राजकन्या नवनाथ घोळवे हिने तृतीय क्रमांक पटकावला.जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी गटात




समाधान रमेश वाघमोडे याने प्रथम, समर्थ संदीपान गुळवी याने द्वितीय, तर मयूर सतीश वाघमोडे याने तृतीय क्रमांक मिळवला. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी 'वन्यजीव संवर्धन सामूहिक शपथ' घेतली. वन्यजीवांचे संरक्षण, निसर्गाचे संवर्धन तसेच मुक्या प्राण्यांप्रती दयाभाव ठेवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामेश्वर बारगजे यांनी केले, तर क्रीडा शिक्षक लहू गव्हाणे यांनी आभार मानले. मुख्याध्यापक आर. बी. सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालासाहेब सोळंके, चमन गुंडे, बाळासाहेब अरुण देशमुख, सुरेश देशमुख, घोडके, कागदे, कुलकर्णी, कांबळे, संजय कुलकर्णी यांच्यासह वनरक्षक नायकोडे व पाईक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक तसेच परिसरातील ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

# ओम कडूची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**आष्टी । सत्यवादी**

येथील तंजीमे तरक्की शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी संचलित महात्मा गांधी माध्यमिक विद्यालय आष्टी या शाळेतील वर्ग नववीत शिकणाऱ्या ओम हनुमंत कडू या विद्यार्थ्याने विभागीय स्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये उत्कृष्ट यश संपादन केल्याने त्यांची राज्य स्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



ओम हनुमंत कडू इयत्ता नववी वर्गात शिकत असून हिंगोली येथे झालेल्या विभागीय स्तरीय स्पर्धेमध्ये १७ वर्षीय ४८ वजन गटांमध्ये औरंगाबाद विभागामध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ओम हनुमंत कडू १७वर्षे वयोगट ४८ किलो जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमधून प्रथम विभाग स्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड व त्यानंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली होती या पैलवानाने न स्वतःची उत्कृष्ट अशी चमक दाखवत यशस्वी कामगिरी करून दाखवली आहे त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मिर्झा नियामत बेग ,उबेद बेग माजी नगरसेवक अस्लम बेग, शाळेचे मुख्याध्यापक तथा पत्रकार जावेद पठाण, आझाद उर्दू शाळेचे मुख्याध्यापक फारोकी एम आय, मिर्झा हाशमतुल्ला बेग उर्दू प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका नसरीन बाजी, संयोजक सय्यद वाहेद,क्रीडा शिक्षक संतोष सायकड, शाळेतील सहशिक्षक हनुमंत पोकळे, संदेश जगताप, श्रीमती अर्चना हजारे, माजी सरपंच महादेव लटपटे, शेख वसीम भाई, शेख वाहेद भाई बब्बू भाई आदींनी अभिनंदन केले आहे.

# ॲड.भास्कर उजगरे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी निवड

**बीड । सत्यवादी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी वडवणी येथील प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. भास्करराव उजगरे यांची पक्षाच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.आज संघर्षयोध्दा जनसंपर्क कार्यालय, बीड येथे जिल्हाध्यक्ष श्री. राजेंद्र मस्के यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

ॲड. भास्करराव उजगरे यांनी यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे बीड जिल्हा संघटक म्हणून अत्यंत प्रभावीपणे जबाबदारी सांभाळत पक्षाची भूमिका जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने कार्य केले आहे. संघटनात्मक कामाचा प्रदीर्घ अनुभव, कायद्याचे सखोल ज्ञान, जनसामान्यांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची भूमिका आणि पक्ष निष्ठा लक्षात घेऊन

त्यांच्यावर पक्षाने पुन्हा एकदा महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.



त्यांच्या कार्यातून निश्चितच पक्ष बळकटीकरणासाठी योगदान लाभेल अशी अपेक्षा यावेळी राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केली. "पक्षाने दिलेली ही नवीन जबाबदारी माझ्यासाठी सन्मानासोबतच मोठी जबाबदारी आहे. आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या पुरोगामी विचारांवर आणि पक्षाचे प्रदेश व जिल्हा नेतृत्व यांच्या मार्गदर्शनाखाली जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी अधिक ताकदीने काम करणार आहे. पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्षाचा विचार गावागावात पोहोचविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करेन," अशी भावना ॲड. भास्करराव उजगरे यांनी व्यक्त केली. आगामी काळात बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासोबतच शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आक्रमकपणे आवाज उठविण्याची भूमिका ॲड. उजगरे यांच्याकडून बजावली जाणार असल्याने त्यांच्या नियुक्तीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. या नियुक्तीबद्दल ॲड. भास्करराव उजगरे यांचे पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार व हितचिंतकांकडून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील संघटनात्मक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत. यावेळी वडवणी तालुकाध्यक्ष महादेवराव जमाले पाटील, जिल्हा संघटक बापूसाहेब घोलप, प्रा. प्रकाश जेधे सर, खलील भाई पठाण, शामसुंदर काळकुटे, अखिल भाई, अनिकेत उजगरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नगरपालिकेने घरपट्टी, पाणीपट्टी रद्द करावी–आंधळे

**परळी । सत्यवादी**

मराठवाड्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी परळी नगरपालिकेने चालू वर्षाची घरपट्टी व पाणीपट्टी रद्द करावी, अशी मागणी माजी शिक्षण सभापती तथा माजी नगरसेवक गोपाळ आंधळे यांनी केली आहे.



यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने संबंधित तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून नागरिकांना विविध सवलती देण्यास सुरुवात केली आहे. तसेच विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आर्थिक अडचणीत सापडलेल्या नागरिकांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातूनही दिलासा मिळणे आवश्यक असल्याचे आंधळे यांनी म्हटले आहे. दुष्काळामुळे शेतकरी, शेतमजूर, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीवर मोठा परिणाम झाला आहे. उत्पन्नाचे साधन कमी झाले असताना नगरपालिका करांचा अतिरिक्त आर्थिक भार नागरिकांवर पडत आहे. त्यामुळे परळी नगरपालिकेने चालू आर्थिक वर्षाची घरपट्टी व पाणीपट्टी पूर्णपणे माफ करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी गोपाळ आंधळे यांनी केली आहे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शासनाकडून ज्या पद्धतीने विविध सवलती दिल्या जात आहेत, त्याच धर्तीवर परळी नगरपालिकेनेही सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.



# आ.सतीश चव्हाण यांच्या संपर्कासह मतदारसंघात उभारलेली संघटनात्मक बांधणी ठरणार महत्त्वाची



### चौथ्या विजयासाठी पदवीधर एकवटले

**बीड । सत्यवादी**
मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे सलग तीन टर्म प्रतिनिधित्व करणारे आ. सतीशराव चव्हाण यांच्या चौथ्या विजयासाठी पदवीधर मतदार, कार्यकर्ते आणि समर्थकांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मागील १८ वर्षांच्या कालावधीत मतदारसंघातील पदवीधरांशी सातत्याने संपर्क ठेवत विविध प्रश्नांवर भूमिका मांडण्याबरोबरच संघटनात्मक पातळीवर उभारलेली बांधणी ही आ. चव्हाण यांच्या राजकीय वाटचालीतील महत्त्वाची बाब असल्याचे त्यांच्या समर्थकांकडून सांगण्यात येत आहे.

आ. सतीशराव चव्हाण यांनी २००८, २०१४ आणि २०२० या तीनही निवडणुकांमध्ये विजय मिळवत मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीत त्यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला होता. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी पुन्हा मैदानात उतरण्याची तयारी सुरू केली असून, त्यामुळे पदवीधर मतदारसंघातील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

**पदवीधरांशी सातत्यपूर्ण संपर्क**
मतदारसंघातील विविध जिल्हे, तालुके आणि ग्रामीण भागात पदवीधर मतदारांशी सातत्याने संपर्क ठेवणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या प्रश्नांना विधान परिषदेत वाचा फोडण्याचा प्रयत्न करणे, हा आ. चव्हाण यांच्या कार्यपद्धतीचा महत्त्वाचा भाग असल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे. मतदारांशी केवळ निवडणुकीच्या काळात नव्हे, तर वर्षभर संपर्क ठेवण्यावर त्यांनी भर दिल्याचेही सांगण्यात येते.पदवीधरांच्या रोजगार, शिक्षण, शैक्षणिक संस्था, विद्यार्थी तसेच सामाजिक क्षेत्राशी संबंधित प्रश्नांवर विधान परिषदेत त्यांनी वेळोवेळी भूमिका मांडल्याचे समर्थकांकडून नमूद करण्यात येते. सभागृहातील कामकाजाबरोबरच मतदारसंघातील विविध प्रश्नांवर संबंधित यंत्रणांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचेही ते सांगतात.

**संघटनात्मक बांधणीला महत्त्व**
मतदारसंघातील प्रत्येक तालुका आणि गावापर्यंत पोहोचणारी संघटनात्मक यंत्रणा उभारण्यावर आ. चव्हाण यांच्या समर्थकांनी भर दिला आहे. पदवीधर

(पान २ वर...)

# वेतन मंजुरीचा टॅब बंद पडल्याने शिक्षकांचे वेतन रखडले!

### अल्प.जिल्हाप्रमुख मोहम्मद अझरुद्दीन यांचा शिक्षणाधिकाऱ्यांना इशारा

**बीड । सत्यवादी**
बीड जिल्ह्यातील अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक संस्थांमधील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सप्टेंबर महिन्याचे वेतन ऑनलाइन मंजुरीअभावी रखडल्याने संतापाची लाट उसळली आहे. शिक्षणाधिकाऱ्यांच्या लॉगिनवर वेतन देयक मंजुरीसाठी असलेला ऑनलाइन 'टॅब' तांत्रिक कारणामुळे बंद असल्याचे सांगण्यात येत असून, त्याचा थेट फटका हजारो शिक्षक-कर्मचाऱ्यांना बसत आहे.



एकीकडे सणासुदीची लगबग आणि दुसरीकडे खात्यात वेतन नाही, अशी गंभीर परिस्थिती शिक्षकांवर ओढवली आहे. घरखर्च, कर्जाचे हप्ते, मुलांचे शिक्षण, वैद्यकीय खर्च तसेच अन्य अत्यावश्यक देणी भागवायची कशी, असा

(पान २ वर...)

# औरंगाबाद विभाग पद्वीधर मतदार संघातुन पत्रकार राजु पाटलांची अपक्ष उमेदवारी

**नांदेड । सत्यवादी**
औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघाच्या दि.२३ ऑक्टोबर रोजी पार पडणाऱ्या निवडणुकीसाठी आज बुधवार शेवटच्या दिवशी छाननी अंतिम सिमावर्ती बिलोली तालुक्यातील शिंपाळा येथील भुमिपुत्र बिलोली चे जेष्ठ पत्रकार तथा समाजिक कार्यकर्ते राजु पाटील शिंपाळकर यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे. येत्या दि. २३ ऑक्टोबर रोजी पार पडणाऱ्या ५ औरंगाबाद पदवीधर विभाग मतदार संघातील विधन परीषदेच्या निवडणुकीच्या रिंगणात आज दि. ७ ऑक्टोबर बुधवार रोजी छानननी अंतिम राजु पाटील शिंपाळकर यांनी दाखल केलेली अपक्ष उमेदवारी वैद्य ठरली

(पान २ वर...)



# बीडच्या दुष्काळी परिस्थितीवर पंकजा मुंडेंची जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा

### जायकवाडीचे पाणी पाटोद्याला द्या

**आष्टी । सत्यवादी**
दोन दिवसाचा दुष्काळी दौरा केल्यानंतर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याशी जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर चर्चा करून प्रशासन करत असलेल्या उपाययोजनांबाबत माहिती घेतली. जायकवाडीचे पाणी पाटोदा तालुक्याला देण्याबाबत तसेच पाणी, चारा आणि जलसंवर्धनाची कामे प्राधान्याने हाती घेण्याबाबत त्यांनी जिल्हा प्रशासनाला सूचना दिल्या.

ना. पंकजाताई मुंडे दोन दिवस

(पान २ वर...)




# चिंचवणमध्ये रात्रीच्या अंधारात सरकारी जमीन हडपणाऱ्या भू-माफियावर गुन्हा दाखल करा!

### महसूल व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर दबाव आणणाऱ्या अंगद बडे विरुद्ध भ्रष्टाचार निर्मूलन समिती आक्रमक; तीव्र आंदोलनाचा इशारा

**वडवणी । सत्यवादी**
बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यांतर्गत येणाऱ्या मौजे चिंचवन येथे शासनाच्या मालकीच्या कोट्यवधी रुपयांच्या मौल्यवान जमिनीवर रात्रीच्या अंधारात बेकायदेशीर पक्के बांधकाम करून शासकीय मालमत्ता हडपल्याचा एक अत्यंत गंभीर प्रकार समोर आला आहे. चिंचवन येथील रहिवासी श्री. अंगद अंबादास बडे याने ग्रामपंचायत कार्यालयालगत असलेल्या अतिशय मोक्याच्या शासकीय गट / सर्वे क्रमांक ५२१ या जमिनीवर उघडपणे डाका टाकला आहे. या बेकायदेशीर कृत्याचा पर्दाफाश करत, संबंधित भू-माफियावर भारतीय न्याय संहिता नुसार तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करून शासकीय जमीन मुक्त करावी, अशी आक्रमक मागणी भ्रष्टाचार निर्मूलन समिती (महाराष्ट्र राज्य) चे राष्ट्रीय अध्यक्ष इंजिनिअर सादिक बाबामीया इनामदार यांनी राज्य प्रशासनाकडे केली आहे.

**शासकीय कर्मचाऱ्यांवर खोट्या तक्रारींचा दबाव; भू-माफियाची दडपशाही!**
प्राप्त माहितीनुसार, मौजे चिंचवन येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या लगत असणारा गट/सर्वे क्रमांक ५२१ हा पूर्णपणे महाराष्ट्र शासनाच्या मालकीचा असून त्याचा कोणताही परवाना किंवा महसूल विभागाची मंजुरी घेतलेली नाही. असे असतानाही, केवळ स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अंगद बडे याने रात्रीच्या वेळेस बेकायदेशीर पक्के बांधकाम पूर्ण केले आणि त्या ठिकाणी त्रिमूर्ती मशनरी व हार्डवेअर नावाचे व्यावसायिक दुकान थाटले.

याहून धक्कादायक बाब म्हणजे, जेव्हा स्थानिक महसूल अधिकारी (तलाठी / मंडळ अधिकारी) आणि ग्रामपंचायत प्रशासनाने या बेकायदेशीर अतिक्रमणावर आक्षेप घेतला, तेव्हा या भू-माफियाने शासकीय कर्मचाऱ्यांनाच दाब-दडपशाही व अरेरावी करण्यास सुरुवात केली. आपल्या बेकायदेशीर कृत्याला कायदेशीर

(पान २ वर...)

# राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त आदर्श मुख्याध्यापिका रिझवाना बेगम कादरी यांचा विशेष सत्कार!




**बीड । सत्यवादी**
मिलिया प्राथमिक मुलींच्या शाळेच्या आदर्श मुख्याध्यापिका श्रीमती रिझवाना बेगम कादरी यांना कादरी फाउंडेशनतर्फे राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार मिळाला बद्दल त्यांचा विशेष सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. अशोक नगरचे केंद्रीय प्रमुख वायकर गोविंद अंकुश यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन कादरी मॅडम यांचा गौरव करण्यात आला.

शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट योगदान, शालेय व्यवस्थापनातील शिस्त आणि विद्यार्थिनींच्या

(पान २ वर...)







# दोन महिन्यांपासून बंद असलेली धारूर-पुणे एसटी सेवा सुरू करा

### बहुजन अधिकार आंदोलनाचे आगार व्यवस्थापकांना निवेदन



**धारूर । सत्यवादी**
धारूर आगारातून पुणे येथे जाणारी एसटी बससेवा गेल्या दोन महिन्यांपासून बंद आहे. त्यामुळे धारूरसह परिसरातील प्रवाशांची मोठी गैरसोय होत असून, ही सेवा पूर्वीच्या वेळापत्रकानुसार तातडीने सुरू करावी, अशी मागणी बहुजन अधिकार आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष राम शेडगे यांनी केली आहे.

धारूर आगार व्यवस्थापकांना बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी निवेदन देण्यात आले. धारूर आगारातून पूर्वी नियमितपणे धारूर ते पुणे एसटी सेवा सुरू होती. मात्र, गेल्या दोन महिन्यांपासून ही सेवा अचानक बंद करण्यात आली आहे. परिणामी धारूर-पुणे प्रवास करणाऱ्या नागरिकांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असून, त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.एसटी सेवा बंद असल्यामुळे प्रवाशांना एसटी महामंडळाच्या विविध सवलतींचाही लाभ घेता येत नाही. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग तसेच इतर सवलतधारक प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे पूर्वीच्या वेळापत्रकानुसार धारूर ते पुणे एसटी सेवा पुन्हा सुरू करून प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.दरम्यान, पूर्वीच्या वेळापत्रकानुसार एसटी बससेवा सुरू न केल्यास प्रवाशांसह आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही बहुजन अधिकार आंदोलनचे संस्थापक अध्यक्ष राम शेंडगे यांनी दिला. एसटी बस आठ दिवसांत सुरू न झाल्यास आगार कार्यालयासमोर आंदोलन करण्याची नोंद निवेदनात करण्यात आली आहे.निवेदनाची प्रत तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, धारूर यांनाही देण्यात आली आहे.

# रिपाइंची दुष्काळग्रस्तांना १०० ट्रक धान्याची मदत

**मुंबई । सत्यवादी**
राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये यंदा दुष्काळ पडला असून शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी संकटात आहेत. त्यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (रिपाइं ) वतीने १०० ट्रक धान्याचा मोफत पुरवठा करण्यात येणार आहे, अशी घोषणा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री व रिपाइं अध्यक्ष रामादास आठवले यांनी केली.नवी मुंबईतील वाशी येथील विष्णुदास भावे नाट्य मंदिरामध्ये रिपाइंचा ६९ वा वर्धापन दिन रविवारी मोठ्या थाटात पार पडला. त्यावेळी झालेल्या पक्ष कार्यकर्ता मेळाव्यात मंत्री आठवले यांनी दुष्काळग्रस्तांना मदतीचे आवाहन केले. यावेळी व्यासपीठावर सीमा आठवले, जित आठवले, रिपाइं राज्य अध्यक्ष राजा सरवदे, राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, युवक आघाडी प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे,काकासाहेब खंबाळकर, बाबुराव कदम, गौतम सोनवणे, कोषाध्यक्ष एम. एस. नंदा उपस्थित होते.रिपाइं पक्ष केवळ बौद्धवाड्यापुरता मर्यादित ठेवायचा नाही. रिपाइं सर्व जाती-धर्मांचा पक्ष बनवायचा आहे. पक्षाची वाटचाल २८ राज्यांमध्ये व ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये होत असून नागालँड आणि मणीपूर या राज्यांमध्ये 'ऊस उत्पादक शेतकरी' हे निवडणूक चिन्ह पक्षाला मिळाले आहे. रिपब्लिकन पक्ष संघर्ष करणारा आहे. सामाजिक न्यायाची लढाई लढणारा पक्ष आहे. आपण सत्तेत नक्कीच आहोत, पण अन्याय झाला तर कोपऱ्यात शांत बसू नका. अन्यायाविरुद्ध रस्त्यावर उतरा, असे आवाहन मंत्री आठवले यांनी केले. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. महाडच्या चवदार तळे क्रांतीच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित केलेला यंदाचा 'समता क्रांती मार्च' दुष्काळामुळे आपण रद्द केला आहे. दुष्काळामुळे होरपळणाऱ्या शेतकरी आणि शेतमजुरांना मदत केली पाहिजे. त्यासाठी रिपब्लिकन पक्ष गरीब असला तरी शंभर ट्रक जीवनावश्यक वस्तूंची मदत दुष्काळग्रस्तांना पाठवणार आहे, असे मंत्री आठवले यांनी जाहीर केले.




This newspaper is published by **Shaikh Rehan Shaikh Feroz** from H.No.3-1-292, Imampur Road, Dhole Wasti, Beed, Maharashtra - 431122 on behalf of Shaikh Rehan Shaikh Feroz, edited by Shaikh Rehan Shaikh Feroz and printed by Abdul Raheman Yusuf Shaikh at Nirmitee Prints, Old Bhaji Market, House No.2-1-54, In Front of Bank of Badoda, Subhash Road, Beed, Maharashtra - 431122.
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com**

**हे पत्र मालक, प्रकाशक शेख रेहान शेख फेरोज यांनी निर्मिती प्रिंट्स, जुनी भाजी मार्केट, घर क्र.२-१-५४, बँक ऑफ बडोदा समोर, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड महाराष्ट्र - ४३११२२ येथे छापून दैनिक आपल्या लोकांचा सत्यवादी कार्यालय इमामपुर रोड, बीड येथे प्रसिद्ध केले.**
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com ※ संपादक : शेख रेहान शेख फेरोज**